यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे 401101.
जा.क्र.माअधि/ऑनलाईन अपिल/४०/2023
दि.७/८/2023.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अंतर्गत ऑनलाईन आर.टी.आय. पोर्टलवर दाखल झालेले प्रथम
(MBMCO/A/2023/60059)

.....अपिल

श्री. जतिन दाधीच,
अे-२०२, इंद्रप्रस्थ
भाईंदर पूर्व – ४०१ १०५

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. 43 दि. 21/8/2023
2023-24
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

.....प्रतिवादी

श्री.नागेश विरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य उदयान अधिक्षक,
उदयान विभाग.

प्रस्तावना :-

श्री. जतिन दाधीच, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मिळणेबाबत दि.०९/०५/२०२३ रोजी (संबंधित विभागास वर्ग दि.१०/०५/२०२३) RTI Online पोर्टलवर माहिती अधिकार अर्ज सादर केला.

[kindly provide me photostat copy of ducuments after complete inspection of the regarding recent tender called for maintenance of Gardens, Playgrounds, cemetery, divider etc by the Garden Department of Mbmc]

अपिल दाखल करण्याची कारणे:-

माहिती अधिकार अंतर्गत दि. ०९/०५/२०२३ (संबंधित विभागास वर्ग दि. १०/०५/२०२३) रोजी RTI Online पोर्टलवर अर्ज केला असता माहिती विहीत मुदतीत मिळाली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.१९/०७/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) यांचेकडे ऑनलाईनद्वारे प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीचा तपशिल:-

अपिलार्थी उपस्थित असून जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग हे प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित आहेत.

माहितीचा अधिकार

जा.क्र.मिभामनपा/ऑनलाईन आरटीआय/उपआयुक्त/६० /२०२३
स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे 401101,
दुरध्वनी क्र.28192828, 28193028
दिनांक:२५ /०७/२०२३

आर.टी.आय.ऑनलाईन पोर्टलवर प्राप्त प्रथम अपिल अर्जावरील सुनावणी

सुनावणी दिनांक:-०७/०८/२०२३
वेळ:- दुपारी वाजता

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४,५,६ जा.क्र.मिभामनपा/उपआयुक्त/६० /२०२३
दिनांक 02/08/2023
मुख्य मुख्य उद्यान अधिक्षक

प्रति,
श्री. जतीन दाधीच,
अ-२०२, इंद्रप्रस्थ,
भाईंदर (पू.) ४०११०५

28-07-23

विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये RTI Online पोर्टलवर दाखल केलेले प्रथम अपिल.

संदर्भ:- आपला ऑनलाईन आर.टी.आय. MBMCO/A/२०२३/६००७१ दि.१७/०७/२०२३ रोजीचा अपील अर्ज.
(या कार्यालयाकडे प्राप्त दि.२०/०७/२०२३)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१) अन्वये RTI Online पोर्टलवर आपला दि.०५/०७/२०२३ रोजीचा अपिल अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर संदर्भाधिन प्रथम अपिलाची सुनावणी, खाली दिलेल्या नमुद दिवशी/वेळी आयोजित करण्यात आलेली असुन सुनावणीस आपण उपस्थित रहावे.

सुनावणीचा दिनांक व वेळ :- दि.०७ /०८/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता.

ठिकाण :- प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) यांचे दालन,
तिसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे 401101.

(कल्पिता पिंपळे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- जनमाहिती अधिकारी तथा उप मुख्य उदयान अधिक्षक, प्रभाग समिती क्र. ४,५,६
यांना सुनावणीचे दिवशी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहणेकामी
(सोबत श्री. जतीन दाधीच यांच्या संदर्भिय अर्जाची छायांकित प्रत)

अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज केला असता अपेक्षित माहिती विहीत मुदतीत मिळाली नसल्याने अपील केलेले आहे.

जनमाहिती अधिकारी, तथा उपमुख्य उदयान अधीक्षक यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-

अपिलार्थी यांना दि.०१/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दि.०९/०६/२०२३ रोजी अवलोकनासाठी बोलांविले होते. अपिलार्थी यांना दि.१२/०७/२०२३ रोजी १७२ पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी गार्डन निगा देखभाल याची Recent Tender बाबत दस्तावेजाची मागणी केली होती. परंतू Recent या शब्दाचा अर्थ Recent Cancell झालेला Tender वाटल्यामुळे सदर Tender Document दिले असे जनमाहिती अधिकारी, तथा उपमुख्य उदयान अधीक्षक यांनी सांगितले.

-: विवेचन :-

जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीच्या आत माहिती देणे आवश्यक होते. तथापि तसे झालेले दिसून येत नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: निर्णय :-

1) अपिल मान्य करण्यात येत आहे.
2) माहिती अधिकारात यापुढे प्राप्त होणा-या अर्जाबाबत जनमाहिती अधिकारी यांना, विहित मुदतीच्या आत माहिती देणेसाठी समज देण्यात येत आहे.
3) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई 400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(कल्पिता पिंपळे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति :-

1) श्री. जतिन दाधीच,
अे-२०२, इंद्रप्रस्थ
भाईंदर पूर्व – ४०१ १०५
2) उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग,
प्रभाग समिती क्र.४,५,६
3) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (उदयान) यांचे कार्यालय.

दूरध्वनी क्र.28193087,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे 401101.
जा.क्र.माअधि/ऑनलाईन अपिल/KO/2023
दि. /८ /2023.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अंतर्गत ऑनलाईन आर.टी.आय. पोर्टलवर दाखल झालेले प्रथम

(MBMCO/A/2023/60059)

श्री. जतिन दाधीच,
ऐ-२०२, इंद्रप्रस्थ
भाईंदर पूर्व – ४०१ १०५ .....अपिलार्थी

श्री.नागेश विरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य उदयान अधिक्षक,
उदयान विभाग. .....प्रतिवादी

प्रस्तावना :-

श्री. जतिन दाधीच, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मिळणेबाबत दि.०९/०५/२०२३ रोजी (संबंधित विभागास वर्ग दि.१०/०५/२०२३) RTI Online पोर्टलवर माहिती अधिकार अर्ज सादर केला.

[kindly provide me photostat copy of ducuments after complete inspection of file regarding recent tender called for maintenance of Gardens, Playgrounds, cemetery, dividers etc by the Garden Department of Mbmc]

अपिल दाखल करण्याची कारणे:-

माहिती अधिकार अंतर्गत दि. ०९/०५/२०२३ (संबंधित विभागास वर्ग दि. १०/०५/२०२३) रोजी RTI Online पोर्टलवर अर्ज केला असता माहिती विहीत मुदतीत मिळाली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.१९/०७/२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (उदयान) यांचेकडे ऑनलाईनद्वारे प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीचा तपशिल:-

अपिलार्थी उपस्थित असून जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य उदयान अधिक्षक, उदयान विभाग हे प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या

_अर्जाचा नमुना_

प्रति:-

राज्य शासकीय माहिती अधिकारी,
माननीय जनमाहिती अधिकारी ,
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
, मिरा रोड ,मिरा भाईंदर महानगरपालिका,
स्वर्गीय विलासराव देशमुख भवन,
कनकिया रोड, मिरारोड, (पूर्व)

१)अर्जदाराचे पूर्ण नाव :- श्री भालचंद्र दयाळ कांबळी , (पत्रकार)

मो. क्र. 9867015612,

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता:- सी- ३०७, रीना अपार्टमेंट , मांडली तलाव जवळ,

भाईंदर (प.), जि. ठाणे

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील -

१) मिरा भाईंदर महानगरपालिका, उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग , मिरारोड, यांच्या कार्यक्षेत्रातील महापालिका स्थापनेपासून आजपर्यंत प्रत्येक आर्थिक वर्षात किती झाडे व कोणत्या कंपनी कडून खरेदी करण्यात आली, झाडे कोणत्या प्रकाराची याचे वर्णन , तसेच त्यासाठी किती रक्कम सदर कंपनीला देण्यात आली, याबाबत धनादेश व बिले यांची छायांकित प्रती, महापालिकेची स्वतः ची नर्सरी असल्यास त्याबाबत ठिकाणाचे वर्णन, अशा नर्सरी केव्हा पासून कार्यरत आहेत याचे दिनांक, या नर्सरीकडून एकूण किती झाडे व कोणत्या ठिकाणी लागवड करण्यात आली , याची आकडेवारी, ,याबाबतची माहिती बाबत कागद पत्रांची झेरॉक्स प्रती (इत्यादी माहिती साक्षांकित केलेली म्हणजेच, माहिती अधिकारी यांची सही व माहिती अधिकार शिक्का) करून देण्यात यावी,

४) पडताळणी व निरीक्षण केल्यानंतर आवश्यक असलेली माहिती स्वीकारण्यात येईल,

५) माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहेत किंवा कसे

माहिती घेण्यास मी स्वतः उपस्थित राहणार

६) माहिती टपाल किंवा कुरिअर याद्वारे पाठविणेत येऊ नये

७) माहिती मिळविण्याचा कालावधी- पंधरा दिवस (१५ दिवस)

८) माहिती कशासाठी हवी आहे - , नागरिकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्याकरिता हवी आहे.

९) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे, वा नाही. अर्जदार सर्वसाधारण आहे _

दि.- १५/०५/ २०२३

ठिकाण- मिरारोड (पू.)

अर्जदाराची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. 99 दि. 25/05/2023

श्री भालचंद्र कांबळी (पत्रकार)

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ — ९९/२०२३-२४ **दिनांक : ०१/६/२०२३**

प्रति,
श्री. भालचंद्र कांबळी (पत्रकार)
सी ३०७ रीना आपार्टमेंट,मांडली तलाव जवळ,
भाईदर (प.)

ok

माहितीचा अधिकार

विषय :- उद्यान व वृक्षप्राधिकरण अंतर्गत कामासंबधी लेखी माहिती मिळणे बाबत.
संदर्भ :- आपला दि. १६/०५/२०२३ रोजीचा अर्ज.

केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये, उद्यान विभाग अंतर्गत कामा संदर्भाची माहिती मुद्दा क्र.१ ते ४ अन्वये आपण, माहिती अधिकार अर्जाद्वारे अपेक्षलेली आहे.

तथापि सदरची माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने सदर माहितीचे आवलोकन करणेकामी आपण बुधवार दि.०७/०६/२०२३ रोजी दुपारी ४.३० वा. कार्यालयीन पत्यावर उपस्थित राहून आवश्यक असणारी माहिती चिन्हांकित केल्यास सदरची माहिती आपणास देणे सोईसकर होईल.

Received - [illegible]
9867015612

(नागेश विरकर)
जन माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

दि० 12/06/2023
वेळ. 4:30 कामना

~~मिरा भाईंदर महानगरपालिका~~
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. ९९ दि. ०४/०५/२०२३

२०२३-२४

उप. मुख्य उद्यान अधिक्षक

केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

नमुनापत्र - ३

माहिती मिळविण्याकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रती,
शासकीय माहिती अधिकारी,
जन माहिती अधिकारी
उद्यान विभाग - मि.भा.मनपा (प्र.क ४।५।६)

(१) अर्जदाराचे पूर्ण नाव : अखिल ~~भारतीय~~ भारतीय कामगार कर्मचारी संघ
(२) पत्ता : शॉप न-३, पद्मावती दर्शन, राम मंदीर रोड, राम मंदीर समोर भाईंदर (प) ४०११०१

(३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील

(एक) माहितीचा विषय : १) मे. निसर्ग लँडस्केप प्रा. लि. अंतर्गत काम करणाऱ्या अस्थायी ठेका कामगारांचा P.F. नंबर, ESIC नंबर सहित नावाची यादी मिळावी

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी : २) मे. निसर्ग लँडस्केप प्रा. लि. मि.भा.महानगरपालीक अंतर्गत उद्याने, मैदाने, स्मशाने व रस्ते लगतचे दुभाजक यांचा २ वर्षाचा कामाचा अहवाल फोटो सहित मिळावा

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : ३) मे. निसर्ग लँडस्केप प्रा. लि. या कंपनीला मिरा-भाईंदर महानगरपालिकेने आता पर्यंत किती रक्कम अदा केली आहे याची तपशिल माहिती मिळावी.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिश: आवश्यक आगे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल) : मिळालेली माहीती मी स्वत: घेऊन जाईन.

(पाच) टपालाद्वारे असेल, त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

(सहा) ज्या साठी माहिती आहे ते प्रयोजन

(सात) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा नाही

④ मे. निसर्ग लँडस्केप प्रा. लि व मिरा भाईंदर मनपा सोबत झालेला करारनामा व कार्यादेश मिळावा

ठिकाण :- मि.भा.मनपा
दिनांक :- 04/05/2023

(अर्जदाराची सही)
Sanjaym
9892375556

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ 20 /२०२३-२४ दिनांक : 02/६/२०२३

माहितीचा अधिकार

प्रति,
अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ,
शॉप नं ३ पद्मावती दर्शन,राम मंदीर रोड,
राम मंदीर समोर,
भाईंदर (प.)

विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये
मे.निसर्ग लॅण्डस्केप प्रा.लि.अंतर्गत काम करणाऱ्या ठेका कामगाराची माहिती मिळणे बाबत
संदर्भ :- आपला दि. ०४/०५/२०२३ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये, मे.निसर्ग लॅण्डस्केप प्रा.लि.अंतर्गत काम करणाऱ्या ठेका कामगाराची माहिती मुद्दा क्रमाक १ ते ४ अन्वये माहिती अपेक्षिलेली आहे.

त्याअनुषंगाने आपण अपेक्षलेली माहिती पत्रासोवत जोडून देत आहे.

(नागेश विरकर)
जन माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

06/06/2023

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ — २२ /२०२३-२४ दिनांक : ०७ /०६/२०२३

माहितीचा अधिकार

प्रति,
श्री.इरफान बाबुराव सय्यद
ए-२०२, रमेश विहार अपार्टमेंट,
इंद्रलोक फेस -४
भाईदर (पु)

विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये,
(मिरा भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वृक्ष संवर्धन व देखभाल दुरुस्ती साठी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराची माहिती मिळणेबाबत)

संदर्भ :- १) आपला दि.२७/१२/२०२२ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
२) आपले दि.२३/०२/२०२३ रोजीचे प्रथम अपिलीय पत्र.
३) मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप. आयुक्त (उद्यान) यांचे दि.२९/०३/२०२३ रोजीचे सुनावणी पत्र.
४) मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप. आयुक्त (उद्यान) यांचा दि.१०/०४/२०२३ रोजीचा अपिलीय निर्णय

महोदय,

केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये, मिरा भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वृक्ष संवर्धन व देखभाल दुरुस्ती साठी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराची ठेका दिल्यापासून ते आज रोजी २०२२ पर्यंत ची माहिती मुद्दा क्रमांक १ ते ३ अन्वये आपण अपेक्षिलेली होती.

तरी आपण अपेक्षिलेली सदरची माहिती पत्रासोबत जोडून देत आहे
(एकुण पृष्ठ संख्या- २०)

(नागेश विरकर)
जन माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईदर महानगरपालिका

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

दिनांक : ०४/१०/२०२१

जा.क्र.: मनपा/वृप्रा/मिरारोड/४७६/2021-22 // कार्यादेश //

प्रति,
मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स,
विरकर निवास बंगलो,इंद्रलोक फ़ेस २
१०० फ़ुट रोड, भाईंदर (पू)-४०१ ६०५

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ अंतर्गत येणाऱ्या विविध उद्याने, मैदाने व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्यांचा पुरवठा करणे.

संदर्भ :- १) मा. विशेष महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१ रोजीची मान्यता.
२)मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ७३ दि. ०८/०९/२०२१ रोजीची मंजूरी.
३) मा. आयुक्त सो. यांची दि. ०९/०९/२०२१ रोजीची मान्यता.
४) दि. ०४/१०/२०२१ रोजीचा करारनामा.
५) जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/४७६/२०२१-२२ दि. ०४/१०/२०२१ रोजीचा वार्षिक कार्यादेश.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ अंतर्गत येणाऱ्या विविध उद्याने, मैदाने व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी निविदेतील व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

अ.क्र.	ठिकाणे	फ़ेरे प्रती दिन
प्रभाग समिती क्र. ०४		
१	आरक्षण क्र. २४२ उद्यान	३ फेरे
२	आरक्षण क्र. २९९ उद्यान	३ फेरे
३	आरक्षण क्र. २६९ उद्यान	२ फेरे
४	आरक्षण क्र. २३५ उद्यान	२ फेरे
५	आरक्षण क्र. १७० मैदान, मिरारोड	१ फेरा
६	आरक्षण क्र.२७३	२ फेरे
७	हटकेश जि.सी.सी. क्लबसमोर ते शांती विद्यानगरी पर्यंत डिवायडर, मिरारोड	१ फेरा
८	कनकिया डिवायडर, मिरारोड	२ फेरे
९	क्विन्स पार्क डिवायडर, दिपक हॉस्पिटलअ माो, मिरारोड	१ फेरा
१०	आरक्षण क्र. १६७ कानुंगो इस्टेट उद्यान	१ फेरा
११	राम रहिम उद्यान, मिरारोड	१ फेरा
१२	एल आर. तिवारी कॉलेज दुभाजक	१ फेरा
१३	दिपक हॉस्पिटल दुभाजक	१ फेरा
१४	आरक्षण क्र. २१६	१ फेरा
१५	आरक्षण क्र. २२१ स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान	२ फेरे
१६	गोल्डन नेस्ट दुभाजक	१ फेरा
१७	सर्वे क्र. ४३१ उद्यान	१ फेरा
१८	आरक्षण क्र. ३१४	२ फेरे
१९	हटकेश नाला (दुभाजक)	१ फेरा

For KANISHK WATER SUPPLIERS
04.10.2021
Proprietor

प्रभाग समिती क्र. ०५		२ फेरे
१	सेक्टर-२ उद्यान/मैदान ,मिरारोड	२ फेरे
२	रेल्वे समातंर दुभाजक, मिरारोड	१ फेरा
३	पुण्यशिल अहिल्याबाई होळकर उद्यान (आर.एन.ए. उद्यान), मिरारोड	१ फेरा
४	सेक्टर-२ सी/२६ बाजुचे उद्यान ,मिरारोड	१ फेरा
५	सेक्टर-३ , नाना नानी पार्क उद्यान , मिरारोड	१ फेरा
६	सेक्टर-४ मैदान, मिरारोड	१ फेरा
७	सेक्टर-८ उद्यान , मिरारोड	१ फेरा
८	चाचा नेहरु उद्यान, मिरारोड	२ फेरे
९	सेक्टर-९ उद्यान , मिरारोड	१ फेरा
१०	सेक्टर-१० उद्यान , मिरारोड	१ फेरा
११	नयानंगर डिवायडर, मिरारोड	१ फेरा
१२	मिरारोड स्टेशन पुनम सागर रोड सृष्टी सेक्टर १ पर्यंत दुभाजक	१ फेरा
१३	मिरारोड स्टेशन टी.एम.टी.बस स्टॉप ते एस. के. स्टोन दुभाजक	१ फेरा
१४	सेक्टर-६ उद्यान , मिरारोड	१ फेरा
१५	सेक्टर-७ उद्यान , मिरारोड	१ फेरा
१६	शांतीनगर सेक्टर-४ उद्यान , मिरारोड	१ फेरा
१७	शांतीनगर सेक्टर-१ बी/२१,२२,२३ उद्यान , मिरारोड	१ फेरा
१८	शांतीनगर सेक्टर-३ मैदान , मिरारोड	१ फेरा
१९	सेक्टर – ५ उद्यान	१ फेरा
२०	आरक्षण क्र. १७८ मैदान	१ फेरा
प्रभाग समिती क्र. ०६		
१	आरक्षण क्र.३७० उद्यान	२ फेरे
२	शितलनगर उद्यान/मैदान ,मिरारोड	२ फेरे
३	सृष्टी ते सिल्वर पार्क दुभाजक, मिरारोड	१ फेरा
४	प्लेझंट पार्क दुभाजक, मिरारोड	१ फेरा
५	शांतीपार्क उद्यान, हॅपी होम सोसायटी जवळ	१ फेरा
६	शांतीपार्क पुनमनगर फ़ेज ३ उद्यान	१ फेरा
७	आरक्षण क्र. ३२९ उद्यान, मिरारोड	१ फेरा
८	पेणकर पाडा स्मशान भुमी बाजुचे उद्यान	१ फेरा
९	शांतीपार्क माधव टॉवर बाजुचे उद्यान	१ फेरा
१०	आरक्षण क्र. ३५३ उद्यान	२ फेरे
११	आरक्षण क्र. ३६५ मैदान	१ फेरा
१२	संघवी नगर दुभाजक / कानुंगो इस्टेट दुभाजक	१ फेरा
१३	आरक्षण क्र. ३६८ उद्यान	१ फेरा
	एकुण	६८ फेरे

उपरोक्त तक्त्याप्रमाणे दि. ५ /१०/२०२१ पासुन (पावसाचे दिवस सोडुन) ते सन २०२२ मध्ये पावसाळा सुरु होई पर्यंत भाडे तत्वावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा.

(संजय शिंदे)
उप-आयुक्त
उद्यान व वृक्षप्राधिकरण
मिरा भाईंदर महानगरपालिका

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क.:/मनपा/वृ.प्र.वि/मिरारोड/७६/२०२१-२२ दिनांक : ०८/१०/२०२१

// वार्षिक कार्यादेश //

प्रति,
मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स,
विरकर निवास बंगलो,इंद्रलोक फ़ेस २
१०० फ़ुट रोड, भाईंदर (पू)-४०१ ६०५

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणे.

संदर्भ :- १) मा. विशेष महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१ रोजीची आर्थिक व प्रशासकीय मान्यता.
२) मा. आयुक्त सो. यांची दि. १९/०५/२०२१ रोजीची E-Tendering Online पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता.
३) मा. निविदा समिती यांची दि. २३/०७/२०२१ रोजीची मान्यता.
४)मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ७३ दि. ०८/०९/२०२१ रोजीची मंजूरी.
५) मा. आयुक्त सो. यांची दि. ०९/०९/२०२१ रोजीची मान्यता.
६) दि. ०४ /१० /२०२१ रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी निविदेतील व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार खालीलप्रमाणे दर मंजूरीचा वार्षिक कार्यादेश देण्यात येत आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर दर
१	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणे. (१ वर्ष कालावधीकरीता पावसाळ्याचे दिवस सोडून)	रु. ४९५/- प्रति फेरा

सदर वार्षिक कार्यादेशाची मुदत दि.०४ /१० /२०२१ ते दि. ०३ / १० /२०२२ पर्यंत अमलात राहील.

(संजय शिंदे)
उप-आयुक्त
उद्यान व वृक्षप्राधिकरण
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

For KANISH. WATER SUPPLIERS
Proprietor

Received
5/10/2021

ठेकेदाराचे नाव :- मे. कनिष्क वॉटर सप्लाय
विरकर निवास बंगलो, इंद्रलोक फेस-२,
१०० फुट रोड, भाईंदर (पु)- ४०११०५.

कामाचे नाव :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत येणाऱ्या विविध उदयाने, स्मशाने, मैदाने, चौपाटया व दुभाजक इत्यादी ठिकाणी पाणी देण्याकरीता भाडे तत्वावर टँकर पुरवठा करण्याबाबत. (वार्षिक निविदा)

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2021 ◑ BE 533687

करारनामा

हा करारनामा दिनांक ०४/१०/२०२१ रोजी करण्यात येत आहे. हा करारनामा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रस्थापित मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने मा. उप आयुक्त मु. (उद्यान), श्री. संजय शिंदे, पत्ता– मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि. ठाणे., यांचे मार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणुन उल्लेख केला जाईल आणि मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांच्यावतीने त्यांचे प्रोप्रायटर श्री.शंकर अंकुश विरकर पत्ता- विरकर निवास बंगलो, इंद्रलोक फेस-२, १०० फुट रोड, भाईंदर (पु)- ४०११०५. यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल, यामध्ये करारनामा होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता भाड्याने टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेकामी मा. विशेष महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१ अन्वये रु.७५,००,०००/- चा खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यते नुसार व मा. आयुक्त यांच्या दि. १९/०५/२०२१ रोजीच्या मान्यतेने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता प्रभाग समिती क्र. १, २, ३, ४, ५ व ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेकामी ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने दि.२९/०५/२०२१ रोजी सा. परशुराम समाचार व दै. द ग्लोबल टाईम्स या वृत्तपत्रात दि.३१/०५/२०२१ ते दि.११/०६/२०२१ या कालावधीत प्रसिध्दी देऊन जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीत ०४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त ०४ निविदाधारकांची Technical Bid दि.१४/०६/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे. तसेच मा. निविदा समिती समोर कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र ०२ निविदाधारकांची दि.०९/०७/२०२१ रोजी Financial Bid उघडण्यात आलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	ठेकेदाराचे नाव	सादर केलेले दर
१	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १, २, ३, ४, ५ व ६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने, चौपाट्या व दुभाजकांना भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणे. (१ वर्ष कालावधीकरीता पावसाळ्याचे दिवस सोडून)	**मे. श्रृती इंटरप्रायजेस (L१)**	**Rs. ५८०/- प्रती फेरा**
		मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स	Rs. ५९९/- प्रती फेरा

उपरोक्त प्रमाणे मे. श्रृती इंटरप्रायजेस यांची कमी दराची (L१) निविदा प्राप्त झालेली असून दराच्या वाटाघाटीकरीता दि.१२/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. परंतु मे. श्रृती इंटरप्रायजेस यांनी निविदेत भरलेले दर प्रती फेरा प्रती टँकर रु. ५८०/- बाजारभावानुसार कमीच असून आणखी दर कमी करणे शक्य नाही. असे दि.२३/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार मे. श्रृती इंटरप्रायजेस यांची आलेली कमी दराची निविदा स्विकारण्यास निविदा समितीने दि.२३/०७/२०२१ रोजी शिफारस केलेली असून त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सदरकामी **"टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे"** या लेखाशिर्षाखाली रु.१००.०० लाख (रु.एक कोटी मात्र) ची तरतूद करण्यात आलेली असून सदर कामाकरिता अंदाजे रु.७५.०० लाख (रु.पंच्याहत्तर लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे. सदर कमी दराच्या वार्षिक निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार मंजूरी मिळणे करीता दि. ०९/०८/२०२१ रोजी नगरसचिव विभागाकडे गोषवारा सादर करण्यात आला होता.

मात्र प्रकरण क्र. ८६ मध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे कामासाठी मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांची रु.४९५/- प्रती फेरा दराची निविदा मंजुर करण्यात आली आहे. पाणी पुरवठा विभागाकडील कामाचे स्वरुप आणि उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकडील कामाचे स्वरुप एकसारखेच असताना पाणी पुरवठा विभागाच्या निविदेमध्ये रु.४९५/- प्रती फेरा व उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या निविदेमध्ये रु. ५८०/- प्रती फेरा दर मंजुर करणे संयुक्तीक होणार नाही तसेच त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होईल. उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकडील L१ निविदाधारक मे. श्रृती इंटरप्रायजेस यांनी दर वाटाघाटीसाठी विभागाने कळविले असता दर कमी करणे शक्य नसल्याचे पत्रान्वये कळविलेले आहे. सबब मे.श्रृती इंटरप्रायजेस यांची निविदा नामंजुर करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

तसेच मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांनी पाणी पुरवठा विभागाकडील निविदेतील दराने (रु.४९५/- प्रती फेरा) काम करणेस तयार असल्याचे प्रशासनाकडे दि. ०७/०९/२०२१ रोजी लेखी पत्र दिले आहे. सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता भाडेतत्वावर टँकरव्दारे पाण्याचा पुरवठा करणेसाठी मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांना रु.४९५/- प्रती फेरा दराने वार्षिक काम देणेस व त्यांचे समवेत करारनामा करुन कार्यादेश देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५(२)(२) नुसार ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे असा संदर्भ क्र. ०६ अन्वये मा. स्थायी समिती सभेचा ठराव पारीत झालेला आहे.

त्यानुसार मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ७३ दि. ०८/०९/२०२१ चे अवलोकन करुन अमलबजावणी करणेस व त्याकामी मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांना रु. ४९५/- प्रति फेरा दराने वार्षिक काम देणेस व त्यांच्या समवेत करारनामा करुन कार्यादेश देणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि. ०९/०९/२०२१ रोजी मंजूरी दिलेली असून दुसरे पक्षीय यांना या कामासाठी नेमण्यासाठी ठरविले आहे.

सदर निविदेची प्रत Annexure No. "A" म्हणुन संबोधण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय हे मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स या नावाने व्यवसाय करीत आहेत आणि त्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाबाबत संमती दर्शविलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये या करारनाम्याच्या व निविदेच्या अटीशर्ती उभय पक्षीय यांना बंधनकारक आहेत.

या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक इत्यादी ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे कामासाठी निविदेतील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्योच व्दितीय पक्षीया यांनी मान्यत केलेले आहे.

२. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे कामासाठी व्दितीय पक्षीय यांना एकुण फेऱ्यांचे रजिस्टर ठेवणे व महानगरपालिकेने निर्देशित केलेल्या फेऱ्या करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल.

३. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करताना पाणी वाया न जाण्याची दक्षता घ्यावी.

४. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करण्यात येणाऱ्या टँकरची क्षमता ८००० ते १०००० लिटर असावी तसेच टँकरला Flexible pipe बसविणे व्दितीय पक्षीय यांना बंधनकारक राहिल.

५. टँकरने पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर "मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवा" अशी पाटी लावणे व्दितीय पक्षीय यांना बंधनकारक राहिल.

६. व्दितीय पक्षीय यांना उपलब्ध करुन दिलेल्या टँकरचे रजिस्ट्रेशन, परमिट, इन्शुरन्स, पी.यु.सी. टँकर चालकांचे लाईसन्स इत्यादी सर्व कागदपत्र उद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

७. महानगरपालिकेमार्फत सदर कामाकरीता कोणत्याही प्रकारचे वाहन अथवा तांत्रिक कर्मचारी पुरविण्यात येणार नाही.

८. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे कामासाठी व्दितीय पक्षीय यांच्या चालु देयकातुन ५% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल.

९. व्दितीय पक्षीय यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा केल्यानंतर योग्य ते लेखी बिल महानगरपालिकेला सादर करतील. सदर बिलाची रक्कम नमुद काम पुर्ण झाल्याचे समाधान झाल्यानंतर महानगरपालिका व्दितीय पक्षीय यांना देऊ करेल असे उभयपक्षीय यांनी मान्य केले.

१०. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे काम कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत पुर्ण न केल्यास प्रति फेरा रु. १००/- (रु. शंभर मात्र) याप्रमाणे दंड आकारण्यात येईल, हे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणेकाम मुदतीत पूर्ण न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पक्षाकडून काम करुन ज्यादा होणारा आकार व्दितीय पक्षीय यांच्याकडुन वसूल करेल.

११. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षति झाल्यास व्दितीय पक्ष क्षतीपूर्ती हमी देत आहेत.

१२. निविदाधारकाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास व्दितीय पक्षीय यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सदर कामाचे करारनामा, कार्यादेश रद्द करुन सदरची कंपनी काळ्या यादीत टाकण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१३. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे काम करणेकरीता उभयपक्षीयांमध्ये काही वाद उपस्थित झाल्यास एक सदस्यीय लवाद म्हणून काम पाहतील त्यांनी दिलेला निर्णय हा उभयपक्षीयांवर बंधनकारक राहील. सदर लवादाचे काम Arbitration and Conciliation Act, १९९६ या कायद्याप्रमाणे होईल. वादाचे ठिकाण जिल्हा ठाणे असेल याची नोंद घेण्यात यावी.

१४. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करण्याचे काम खंडीत करण्याचे अधिकार सर्वस्वी मा. आयुक्त सो. यांना राहतील.

१५. व्दितीय पक्षीय यांच्याकडुन नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत, GST व इतर कर बिलातून कपात करण्यात येईल. निविदाधारकाने प्रदान करावयाच्या करामध्ये वाढ झाल्यास वाढीव रक्कम प्रदान करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१६. Safety requirements: मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे काम करताना कामगारांना इजा, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Loss of Life) याची सर्व भरपाईची व इतर कायदेशीर जबाबदारी निविदाधारकाची राहील तसेच वाहनांच्या देखभालीची संपुर्ण जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील.

१७. Financial & Legal Liability :- करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी व्दितीय पक्षकाराची राहील.

१८. Subcontract :- निविदाधारक मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने, चौपाट्या, नर्सरी व दुभाजक तसेच इतर ठिकाणी आवश्यतेनुसार व वेळोवेळी मागणी केल्यानुसार भाडेतत्वावर पाण्याचे टँकर पुरवठा करणे काम सबकॉन्ट्रेक्टरास देता येणार नाही.

१९. सदर कामी व्दितीय पक्षीय यांनी भरलेले सुरक्षा अनामत रक्कम करारनाम्याची मुदत संपल्यानंतर व्दितीय पक्षीय यांनी लेखी अर्ज केल्यानंतर नियमाप्रमाणे महानगरपालिकेने परत करायचे मान्य केले आहे.

२०. नैसर्गिक आपत्ती उदा. वारा, वादळ, पाऊस, पुर, विज पडणे, भुकंप, ज्वालामुखी इ. व तसेच संप, संचारबंदी, इजा, अपघात यामुळे होणाऱ्या वित्तीय व मनुष्यहाणीस व्दितीय पक्ष जबाबदार राहतील.

२१. महानगरपालिकेस आपश्यकता वाटल्यास सदर कामाची मुदत संपल्यानंतर नविन निविदा मंजुर होऊन कार्यादेश निर्गमीत होईपर्यंत पुर्वीच्याच मंजुर दराने ठेकेदारास काम करावे लागेल.

२२. सदर करारनाम्याचा कालावधी दि. ०४/१०/ 2029 पासून दि. 03/10/2022 पर्यंत राहील.

करारनाम्यातील वरील सर्व अटीशर्ती व निविदेतील सर्व अटीशर्ती प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले असुन त्या बंधनकारक आहेत व त्यानुसार स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

सदरचा करारनामा आज दि. ०४/१०/२०२१ रोजी चांगल्या मन:स्थितीत लिहून दिला आहे.

मा. [illegible]

प्रथम पक्षीय

(संजय शिंदे)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(01) Sanjay Thorade

(02)

व्दितीय पक्षीय
For KANISHK WATER SUPPLIERS

Proprietor

(मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स)
चे प्रोप्रायटर श्री. शंकर अंकुश विरकर.

सन २०२१/२२/ करारनामा रजिस्टर अनु. क्रं. 322 दि. ४/१०/२१ अन्वये बोध करणेत आली.

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

साक्षीदार :-

१) नाव :- शरद श्रीवंत पवार. शरद श्री. पवार
पत्ता 404, श्री साई दर्शन सीएचएसएल, पवाडे हॉटेल समोर, भाईंदर (पुर्व) 401101

२) नाव :- पारस नलिन वेदांत
पत्ता :- 494, बोशीलाल चाळ, रेतीबंदर, घोडबंदर गाव - 401107

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/वृप्र/मिरारोड/८३०/२०२१-२२ दिनांक : 23/03/2022

// वार्षिक कार्यादेश //

प्रति,
मे. हिरावती इंटरप्रायजेस,
आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,
अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३

विषय -: मिरा भाईंदर क्षेत्रातील नव्याने विकसीत केलेल्या विविध उद्याने, मैदाने, दुभाजके व वृक्षारोपण करणेरकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणे. (कालावधी - १ वर्ष)

संदर्भ -: १) मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता.
२) मा. आयुक्त सो. यांची दि. ३१/१२/२०२१ रोजीची मान्यता.
३) दि. ०४/०१/२०२२ रोजी दै. लोकनायक व सा. परशुराम समाचार या वृत्तपत्रात तसेच E-Tendering Online प्रणालीद्वारे N.I.C.च्या https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर जाहिर निविदा प्रसिद्धी.
४) मा. निविदा समिती यांची दि. ११/०३/२०२२ रोजीची मान्यता.
५) मा.आयुक्त सो. यांची दि. ११/०३/२०२२ रोजीची निविदेस मान्यता.
६) मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.१६८ दि. २१/०३/२०२२ अन्वये मान्यता.
७) दि.२३/०३/२०२२ रोजीचा करारनामा

मिरा भाईंदर क्षेत्रातील नव्याने विकसीत केलेल्या विविध उद्याने, मैदाने, दुभाजके व वृक्षारोपण करणेरकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी निविदेतील व करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार खालीलप्रमाणे वार्षिक कार्यादेश देण्यात येत आहे.

अ.क्र.	तपशिल	मंजुर दर
१	लालमाती	रु. २,५८१/- प्रति ब्रास
२	शेणखत	रु. २,४२०/- प्रति ब्रास
३	सफेदरेती	रु. ५,९९०/- प्रति ब्रास

उपरोक्त प्रमाणे वेळोवेळी व आवश्यकतेनुसार महानगरपालिकेने केलेल्या मागणीनुसार लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करण्यात यावीत. सदर कार्यादेशाची मुदत दि. 23/०३/२०२२ ते दि. 22/०३/२०२३ पर्यंत राहिल.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(संजय शिंदे)
उप.आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

G:\OLD BACKUP DATA\2021-22\Karyadesh\Hiravati enterprises

CHALLAN
MTR Form Number-6

GRN MH015143350202122E	BARCODE	Date 23/03/2022-15:04:11	Form ID
Department Inspector General Of Registration			
Type of Payment Non-Judicial Stamps Purchase of Franking Code SoS Mumbai only			
Office Name GENERAL STAMP OFFICE MUMBAI			
Location MUMBAI			
Year 2021-2022 One Time			

Account Head Details	Amount In Rs.
0030045501 Amount of Tax	15000.00
Total	15,000.00

Payer Details

TAX ID / TAN (If Any)	
PAN No.(If Applicable)	
Full Name	Hiravati Enterprises
Flat/Block No. Premises/Building	RR Yadav Compound
Road/Street	Shere-E-Punjab Mahakali cave RD
Area/Locality Town/City/District	Andheri East
PIN	4 0 0 0 9 3
Remarks (If Any)	Supply of Red Soil Manure and white sand for Garden and tree Authority Department in MBMC
Amount In Words	Fifteen Thousand Rupees Only

Payment Details	IDBI BANK	FOR USE IN RECEIVING BANK			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	69103332022032320450	2736527704
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	23/03/2022-15:05:22	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		IDBI BANK	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Department ID : Mobile No. : 8108499975

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

Print Date 23-03-2022 03:05:33

// करारनामा //

हा करारनामा दिनांक 23 /०३/२०२२ रोजी करण्यात येत आहे. हा करारनामा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रस्थापित मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने **उप. आयुक्त (उद्यान), श्री. संजय शिंदे, पत्ता – मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि. ठाणे.** यांचेमार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणून उल्लेख केला जाईल आणि मे. हिरावती इंटरप्रायजेस यांच्यावतीने त्यांचे प्रोप्रायटर श्री. सुशांत तिर्थराज यादव. पत्ता – आर.आर. यादव कंपाऊंड. महाकाली रोड,अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३ यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल, यांच्यामध्ये करारनामा होत आहे.

ज्याअर्थी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ अन्वये प्रस्थापित झालेली मिरा भाईंदर महानगरपालिका ही प्रथम पक्षीय असून मे. हिरावती इंटरप्रायजेस. हे व्दितीय पक्षीय आहेत. ज्याअर्थी मिरा भाईंदर क्षेत्रातील नव्याने विकसीत केलेल्या विविध उद्याने, मैदाने, दुभाजके व वृक्षारोपण करणेरकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणे (कालावधी १ वर्ष)आवश्यक आहे.

त्याअर्थी मिरा भाईंदर क्षेत्रातील नव्याने विकसीत केलेल्या विविध उद्याने, मैदाने, दुभाजके व वृक्षारोपण करणेरकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यते नुसार व मा. आयुक्त यांच्या दि. ३१/१२/२०२१ रोजीच्या मान्यतेने मिरा भाईंदर क्षेत्रातील नव्याने विकसीत केलेल्या विविध उद्याने, मैदाने, दुभाजके व वृक्षारोपण करणेरकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने दि.०४/०१/२०२२ रोजी दै. लोकनायक व सा. परशुराम समाचार या वृत्तपत्रात जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर कालावधी मध्ये एकच निविदा प्राप्त झाल्याने दि.३१/०१/२०२२ ते दि.०७/०२/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सदर कालावधीत ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त ०३ निविदाधारकांची Technical Bid दि.१०/०२/२०२२ रोजी उघडण्यात आलेली आहे. तसेच मा. निविदा समिती समोर कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र ०२ निविदाधारकांची दि.१०/०३/२०२२ रोजी Financial Bid उघडण्यात आलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशिल	मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केप	मे, हिरावती इंटरप्रायजेस (L१)	मे. हिरावती इंटरप्रायजेस यांचे वाटाघाटीचे दर
१	लालमाती	रु. २,७९९/- प्रति ब्रास	रु. २,६९९/- प्रति ब्रास	**रु. २,५८१/- प्रति ब्रास**
२	शेणखत	रु. २,८००/- प्रति ब्रास	रु. २,५९९/- प्रति ब्रास	**रु. २,४२०/- प्रति ब्रास**
३	सफेदरेती	रु. ६,३००/- प्रति ब्रास	रु. ५,९९९/- प्रति ब्रास	**रु. ५,९९०/- प्रति ब्रास**

उपरोक्त प्रमाणे निविदा दर सुचीमध्ये L१ निविदाधारकांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटीअंती वरील प्रमाणे दर कमी केलेले असून मे. हिरावती इंटरप्रायजेस यांची वाटाघाटाअंती आलेली कमी दराची निविदा स्विकारण्यास मा.निविदा समितीने दि.११/०३/२०२२ रोजी शिफारस केलेली असून त्यास मा. आयुक्त यांनी दि. ११/०३/२०२२ रोजी मान्यता दिलेली असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत **"लालमाती / शेणखत पुरवठा करणे"** या लेखाशिर्षाखाली रु. ७५.०० लाख (रु. पंच्याहत्तर लाख मात्र) व उद्यान विभाग अंतर्गत **"लालमाती / शेणखत / सफेदरेती पुरवठा करणे"** या लेखाशिर्षाखाली रु.२००.०० लाख (रु. दोन कोटी मात्र) ची तरतूद करण्यात आलेली असून सदर कामाकरिता अंदाजे रु.७५.०० लाख (रु. पंच्याहत्तर लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे. सदर कमी दराची मे. हिरावती इंटरप्रायजेस यांच्या वार्षिक निविदेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. दि.२१/०३/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर निविदेची प्रत Annexure No. "A" म्हणून संबोधण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय हे मे. हिरावती इंटरप्रायजेस या नावाने व्यवसाय करीत आहेत आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाबाबत संमती दर्शविलेली आहे.

आणि ज्याअर्थी अटी व शर्तीनूसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये या कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीयांना बंधनकारक आहेत.

या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत

१. मिरा भाईंदर क्षेत्रातील नव्याने विकसीत केलेल्या विविध उद्याने, मैदाने, दुभाजके व वृक्षारोपण करणेरकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणे कामासाठी निविदा पुस्तिकेतील, गोषवाऱ्यामधील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याचे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे.

२. मिरा भाईंदर क्षेत्रातील नव्याने विकसीत केलेल्या विविध उद्याने, मैदाने, दुभाजके व वृक्षारोपण करणेकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणे व इतरत्र आवश्यकतेनुसार व वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार लागणारी लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करण्याचे व्दितीय पक्षीय (L१) यांनी मान्य केले आहे.

शेणखत व सफेदरेती पुरवठा करण्याचे व्दितीय पक्षीय (L१) यांनी मान्य केले आहे.

३. सदरकामी लागणारा आवश्यक तो तांत्रिक व क्षेत्रीय कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था स्वत:च करावी लागेल.

४. महानगरपालिकेमार्फत सदर कामाकरीता कोणत्याही प्रकारची मशीनरी, वाहन अथवा तांत्रिक कर्मचारी पुरविण्यात येणार नाही.

५. सदर करारनाम्या अंतर्गत आवश्यकतेनुसार व वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करण्याचे काम कार्यादेशामध्ये नमुद केलेल्या मुदतीप्रमाणे पूर्ण करुन देण्याचे व्दितीय पक्षीय (L१) यांनी मान्य केलेले आहे.

६. सदर लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा कामासाठी व्दितीय पक्षीय (L१) यांनी ५% सुरक्षा अनामत रक्कम देण्याचे मान्य केलेले असुन २% कार्यादेशापुर्वी व ३% चालु देयकामधुन सुरक्षा अनामत रक्कम देण्याचे मान्य केले आहे. सदरची सुरक्षा अनामत रककम महानगरपालिका फंडात जमा करण्याचे व्दितीय पक्षीय (L१) यांनी मान्य केले आहे.

७. व्दितीय पक्षीय (L१) यांनी लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा केल्याचे काम केल्यानंतर योग्य ते लेखी देयक महानगरपालिकेस सादर करतील व तदनंतरच सदर देयकाची रक्कम महानगरपालिका व्दितीय पक्षीय (L१) यांना देऊ करेल असे उभयपक्षीय यांनी मान्य केले आहे.

८. आवश्यकतेनुसार व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठ्याचे काम विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यास प्रती ब्रास रु.२००/- (रु. दोनशे मात्र) प्रती दिवस याप्रमाणे दंड आकारण्यात येईल, हे व्दितीय पक्षी (L१) यांनी मान्य केले आहे.लालमाती व सफेदरेती पुरवठ्याचे काम मुदतीत पुर्ण न केल्यास / नकार दिल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पक्षाकडुन काम करुन ज्यादा होणारा आकार व्दितीय पक्षीय (L१) यांच्या कडुन वसूल करेल.

९. निविदाधारकाने लालमाती व सफेदरेतीचा पुरवठा करताना चलनासोबत जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज वाहतुक परवाना (रॉयल्टी) भरलेल्या पावतीच्या मुळ प्रती सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा देयक अदा करण्यात येणार नाही. निविदाधारकास त्याने केलेल्या प्रत्यक्ष पुरवठ्याच्या प्रमाणात देयक प्रदान करण्यात येईल.

१०. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षति झाल्यास व्दितीय पक्ष क्षतीपूर्ती हमी देत आहेत.

११. महानगरपालिका कमी अधिक प्रमाणात आवश्यकतेनुसार व वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार लालमाती, शेणखत व सफेदरेतीची मागणी करीत आणि त्याप्रमाणे लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणे व्दितीय पक्ष (L१) यांना बंधनकारक राहिल.

१२. महानगरपालिकेस आवश्यकता भासल्यास व लेखी सुचना दिल्यास प्रती दिन लालमाती २० ब्रास, सफेदरेती ५ ब्रास एवढी पुरवठा करण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष (L१) यांची राहिल व यामध्ये कुठलीही हयगय करणार नाहीत.

१३. व्दितीय पक्षाने / निविदाधारकाने लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठ्याचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटी शर्तींचा व करारनाम्यातील अटीशर्तींचा भंग केल्यास किंवा लालमाती व सफेदरेती पुरवठ्याबाबत संबंधीत खात्याकडुन / विभागाकडुन तक्रार प्राप्त झाल्यास / आल्यास व्दितीय पक्ष / निविदाधारक (L१) यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचे काम रद्द करुन कंपनीस / व्दितीय पक्षास (L१) / निविदाधारकास काळ्या यादीत टाकण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी व तदनंतर निविदेतील (L२) यांच्याकडुन आवश्यक लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करुन घेण्यात येईल व त्याबाबतच्या फरकापोटी असणारी रक्कम (L१) यांच्याकडुन विहीत पध्दतीने कायद्यानुसार / नियमानुसार वसुल करण्यात येईल.

१४. व्दितीय पक्षाने / निविदाधारकाने (L१) लालमाती, शेणखत व सफेदरेतीचा पुरवठा करताना मालासोबत मुळ चलन व देयक देणे आवश्यक आहे. मुळ चलनाशिवाय माल स्विकारला जाणार नाही किंवा तदनंतर तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१५. लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामी उभयपक्षीयांमध्ये काही वाद उपस्थित झाल्यास एक सदस्यीय लवाद म्हणुन काम पाहतील त्यांनी दिलेला निर्णय हा उभय पक्षीयांवर बंधनकारक राहील. सदर लवादाचे काम Arbitration and Conciliation Act, १९९६ या कायद्याप्रमाणे होईल. सदर कामासंदर्भात उभय पक्षीयांच्या मध्ये वाद उद्भवल्यास मा. न्यायालय ठाणे जिल्हा कार्यक्षेत्र असेल.

१६. व्दितीय पक्षीय यांच्याकडुन नियमाप्रमाणे आयकर व इतर कर देयकातून कपात करण्यात येईल. निविदाधारकाने प्रदान करावयाच्या करामध्ये वाढ झाल्यास वाढीव रक्कम प्रदान करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१७. Safety requirements: लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करताना इजा, अपंगत्व, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Permanent Disability, Loss of Life etc.) याची सर्व भरपाईची व इतर कायदेशीर जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

१८. Financial & legal liability: निविदेतील आणि करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१९. Subcontract: व्दितीय पक्षीयांना लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रेक्टरला देता येणार नाही.

२०. सदर कामी व्दितीय पक्ष यांनी भरलेले (EMD) अधिक सुरक्षा अनामत रक्कम असे एकुण ५% (अक्षरी पाच टक्के) करारनाम्यानुसार काम पुर्ण झाल्यानंतर व्दितीय पक्ष यांनी मुळ पावतीसह लेखी अर्ज केल्यानंतर नियमाप्रमाणे महानगरपालिकेने परत करायचे मान्य केले आहे. त्या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

२१. नैसर्गिक आपत्ती उदा. वारा, वादळ, पाऊस, पुर, विज पडणे, भूकंप, ज्वालामुखी, इ. व तसेच संप, संचारबंदी, इजा. अपघात यामुळे होणाऱ्या वित्तीय व मनुष्यहानीस व्दितीय पक्ष सर्वस्वी जबाबदार राहतील.
करारनाम्यातील वरील सर्व अटीशती व निविदेतील सर्व अटीशर्ती प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय (L१) यांनी मान्य केल्या असुन त्या बंधनकारक आहेत व त्यानुसार स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

२२. सदर कामाचा कालावधी ०१ वर्षाकरीता राहिल. परंतू काही कारणास्तव सदर करारनाम्याचा कालावधी वाढवावा लागल्यास, व्दितीय पक्षीय यांचे काम समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतर करारनाम्याचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांस राहिल सदर वाढीव कालावधीच्या करारनाम्याची मुद्रांक शुल्क भरणेची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहिल.

२३. सदर करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क कायद्यानुसार योग्य ती मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहिल.

करारनाम्यातील वरील सर्व अटीशर्ती व निविदेतील सर्व अटीशर्ती प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय यांनी मान्य केल्या असून त्या बंधनकारक आहेत व त्यानुसार स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

सदरचा करारनामा आज दिनांक /०३/२०२२ रोजी चांगल्या मन:स्थितीत लिहून दिला आहे.

प्रथम पक्षीय

(संजय शिंदे)
उप आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

व्दितीय पक्षीय
(मे. हिरावती इंटरप्रायजेस)
चे प्रोप्रायटर श्री. सुशांत तिर्थराज यादव

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI

१) नाव :- RAMU YADAV
पत्ता :- B/801 RNA Heights JVLRd Andheri(E)
भ्रमणध्वनी :- 9867336543

२) नाव :- Rajkumar
पत्ता :- F/5 Malinee APA M.C.Rd. Andheri (E)
भ्रमणध्वनी :- 8368512819

सन २०२१/२२ / करारनामा रजिस्टर अनु. क्रं. ७९८ दि. २३/३/२२ अन्वये नोंद करण्यात आली.

सहा. पालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/पु.पा/मिरारोड/कार्यादेश/३७/२०२२-२३ दिनांक : २९/६/२०२२

// कार्यादेश //

प्रति,
मे.बाबा प्ले वर्ल्ड,
४-बी, कृष्णस्थळ, नंदनवन
सोसायटी,मिरागाव,मिरारोड (पु.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ करीता नव्याने वृक्षारोपण केलेल्या रोपांकरीता संरक्षणार्थ लोखंडी पिंजरे करणे

संदर्भ :- १) मा. आयुक्त सो यांची दि. २३/०५/२०२२ रोजीची मंजुरी.
२) दि. २४/०५/२०२२ रोजीची जाहिर ऑफ लाईन निविदा प्रसिध्दी.
३) मा. आयुक्त सो. यांची दि. २७/०६/२०२२ रोजीची निविदेस मंजुरी.
४) दि.२७/०६/२०२२ रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ करीता नव्याने वृक्षारोपण केलेल्या रोपांकरीता संरक्षणार्थ लोखंडी पिंजरे खरेदी करणेकामी आपणास खालीलप्रमाणे निविदेतील व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार कार्यादेश देण्यात येत आहे.

Sr.No	कामाचा तपशिल	मंजुर दर	एकुण नग	रक्कम
१.	मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ करीता नव्याने वृक्षारोपण केलेल्या रोपांकरीता संरक्षणार्थ लोखंडी पिंजरे करणे.	रु.२,१५०/-	३९४	रु.८,४७,१००/-
			१८% GST	रु.१,५२,४७८/-
			एकुण रक्कम	रु.९,९९,५७८/-

उपरोक्त प्रमाणे लोखंडी पिंजरे २० दिवसात पुरवठा करण्यात यावेत.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

Pre Vendam
29/06/2022

29/6
(संजय शिंदे)
उप-आयुक्त (उद्यान)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\OLD BACKUP DATA\2022 22\Karyadesh\BABA PLAY WORLD

CHALLAN
MTR Form Number-6

GRN MH004058381202223E	BARCODE	Date 27/06/2022-16:37:23	Form ID
Department Inspector General Of Registration			
Type of Payment Non-Judicial Stamps Purchase of Franking Code SoS Mumbai only			
Office Name THD_JT DIST REGISTRAR THANE RURAL			
Location THANE			
Year 2022-2023 One Time			

Account Head Details	Amount In Rs.
0030045501 Amount of Tax	2000.00
Total	2,000.00

Payer Details

TAX ID / TAN (If Any)	
PAN No.(If Applicable)	AEBPT9402L
Full Name	BABA PLAY WORLD
Flat/Block No. Premises/Building	29-B MIRA CO OP IND ESTATE
Road/Street	W E HIGHWAY
Area/Locality Town/City/District	MIRA ROAD EAST
PIN	4 0 1 1 0 7
Remarks (If Any)	SUPPLY OF TREE GUARDS AT PRABHAG SAMITI No 4 5 AND 6 of MBMC AREA
Amount In Words	Two Thousand Rupees Only

Payment Details	UNION BANK OF INDIA
Cheque-DD Details	
Cheque/DD No.	
Name of Bank	
Name of Branch	

FOR USE IN RECEIVING BANK

Bank CIN	Ref. No.	02901792022062723611	511091726
Bank Date	RBI Date	27/06/2022-16:39:34	Not Verified with RBI
Bank-Branch		UNION BANK OF INDIA	
Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Department ID :

Mobile No. : 9930915575

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

// करारनामा //

हा करारनामा दिनांक २७/०६/२०२२ रोजी करण्यात येत आहे. हा करारनामा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रस्थापित मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने **उप. आयुक्त (उद्यान), श्री. संजय शिंदे, पत्ता – मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि. ठाणे.** यांचेमार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणून उल्लेख केला जाईल आणि मे.बाबा प्ले वर्ल्ड यांच्यावतीने त्यांचे प्रोप्रायटर **श्री. बाबाजी चंद्रकांत तावडे, पत्ता ४-बी, कृष्णस्थल, नंदनवन सोसायटी, मिरागाव, मिरा रोड (पु).** यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल, यांच्यामध्ये करारनामा होत आहे.

ज्याअर्थी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ अन्वये प्रस्थापित झालेली मिरा भाईंदर महानगरपालिका ही प्रथम पक्षीय असून मे. बाबा प्ले वर्ल्ड हे व्दितीय पक्षीय आहेत. ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ करीता नव्याने वृक्षारोपण केलेल्या रोपांकरीता संरक्षणार्थ लोखंडी पिंजरे खरेदी करणेकामी वार्षिक निविदा मागवुन दर निश्चिती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त सो. यांनी दि.२३/०५/२०२२ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार दि.२४/०५/२०२२ रोजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर Off-line पध्दतीने मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ करीता नव्याने वृक्षारोपण केलेल्या रोपांकरीता संरक्षणार्थ लोखंडी पिंजरे खरेदी करणेकामी वार्षिक निविदा मागवुन दर निश्चिती करणेबाबत. निविदा दि.२४/०५/२०२२ ते दि.१३/०६/२०२२ रोजी मागविण्यात आल्या होत्या.

ज्याअर्थी प्रथम पक्षीय यांनी दिलेल्या प्रस्तावाचा आणि कामाच्या तपशिलाचा विचार करुन व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाकरीता दिलेली संमतीनूसार मा. आयुक्त सो. यांच्या दि. २७/०६/२०२२ रोजीच्या मंजूरी अन्वये दुसरे पक्षीय यांना या कामासाठी नेमण्यासाठी ठरविले आहे आणि खालील दरानूसार मान्यता देण्यात आली आहे. सदर करार करारनामा अंमलात आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता अंमलात राहील.

Sr. No.	कामाचा तपशिल		मे. हनी फन एन ग्रील कं.	मे. हिरावती इंटरप्रायजेस	मे. बाबा प्ले वर्ल्ड
१.	**Area : 21" Diameter** Tree Guard Specification :- Circular Tree Guard of Angle Iron 25X25X3 thickness consisting of three circular frame made of M.S. patti 20X4 iron vertical member welded with G.I. net 4" X 4".	दर प्रति नग	रु.२२७५/- प्रती नग	रु.२५००/- प्रती नग	रु.२१५०/- प्रती नग
		GST Rate	१८%	१८%	१८%

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद प्रमाणे मे. बाबा प्ले वर्ल्ड यांची कमी दराची **निविदा** स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. २७/०६/२०२२ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सदर निविदेची प्रत Annexure No. "A" म्हणून संबोधण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय हे मे. बाबा प्ले वर्ल्ड या नावाने व्यवसाय करीत आहेत आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाबाबत संमती दर्शविलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ करीता नव्याने वृक्षारोपण केलेल्या रोपांकरीता संरक्षणार्थ लोखंडी पिंजरे खरेदी करणे. उपरोक्त नमुद दर मंजुर करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी अटी व शर्तीनूसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये या कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीयांना बंधनकारक आहेत.

या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत

१. मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ करीता नव्याने वृक्षारोपण केलेल्या रोपांकरीता संरक्षणार्थ लोखंडी पिंजरे खरेदी करणेबाबत. खालील अटी व शर्तींचे पालन करण्याचे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे.

